## तुर्तातुर्त मनाई हुकूम अर्ज निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश

(पारित केल्याचा दिनांक **०३** ***माहे ऑक्टोबर, २०२२***)

०१. प्रस्तूत अर्ज वादींनी शपथपत्रासह ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ९४ सह क्रम ३९ नियम ०१ व ०२*** अनुसार दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादींनी अगर त्यांचेतर्फे इतरांनी ***वाद मिळकत कोणालाही विक्री, गहाण, दान, ठरावपत्र किंवा अन्य दस्ताआधारे हस्तांतरीत करु नये*** असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे.

### वादपत्र व अर्ज नि.क्र.०५ मधील प्रमुख तथ्ये खालीलप्रमाणे :-

०२. मौजे शिवली तालुका औसा येथील जमीन गट क्रमांक ४१८ पैकी क्षेत्र ०२ हेक्टर १६ आर ही जमीन वादी प्रतिवादींची एकत्र कुटुंबाची वडीलोपार्जीत मिळकत असून त्यामध्ये एक स्वतंत्र बोअरवेल आहे. यापुढे **वाद मिळकत** असे संबोधले आहे

०३. वादी क्रमांक ०१ ही वादी क्रमांक ०२ व ०३ यांची जन्मदाती आई असून प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांचा मयत मुलगा कमलाकरची पत्नी म्हणजेच त्यांची सून आहे. प्रतिवादी क्रमांक ०३ ते ०५ हे वादी क्रमांक ०१ चे अनुक्रमे पुतण्या, दीर आणि नणंद आहेत. वादी क्रमांक ०१ चे पती यांचा मृत्यू दिनांक १४.४.२०२१ रोजी झाला आहे. वादी क्रमांक ०१ ही तिच्या पती सोबत मागील दहा ते बारा वर्षापासून मौजे कोंडी तालुका आणि जिल्हा सोलापूर येथे राहत होती. प्रतिवादी क्रमांक ०१ ने वाद मिळकतीचे बक्षीसपत्र दिनांक २०.०९.२०२१ रोजी प्रतिवादी क्रमांक ०३ च्या हक्कात करुन दिल्याचे वादीला समजले. म्हणून वादीने दिनांक ०८.१२.२०२१ रोजी प्रतिवादींकडे मौजे शिवली गावातील प्रतिष्ठित व्यक्तीसमक्ष वाद मिळकतीची वाटणी मागितली असता त्यांनी नकार दिला. म्हणून वादीने तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

## प्रतिवादींच्या कैफियत व म्हणण्यातील तथ्ये खालीलप्रमाणे :

०४. प्रतिवादींनी कैफियत आणि म्हणणे **नि.क्र.३३** दाखल केले. प्रतिवादींनी नातेसंबंध कबूल केले. प्रतिवादींनी विशेष हकिकतीद्वारे असे कथन केले की, वाद मिळकत वडीलोपार्जीत नसून ती प्रतिवादी क्रमांक ०१ ने दस्त नोंदणी क्रमांक १२९९/१९९५ आणि १३००/१९९५ अन्वये पुष्पाबाई ज्ञानदेव वाघमारे आणि लिंबराज माधवराव वाघमारे यांचेकडून खरेदी केली असून ती त्याची स्वसंपादित मिळकत आहे. वादी क्रमांक ०१ चे पती आणि प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०५ यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. प्रतिवादी क्रमांक ०१ ने प्रतिवादी क्रमांक ०३ च्या हक्कात बक्षीसपत्र दस्त क्रमांक ३४८९/२०२१ करुन दिले आहे. म्हणून प्रतिवादींनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०५. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. डी. एच. सराफ** आणि प्रतिवादींतर्फे विधीज्ञ **श्री. एस. व्ही. गोरे** यांचा युक्तिवाद ऐकला.

०६. दोन्ही पक्षांचे कथन व कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तूत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थितीत झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतदर्शनी दावा त्याच्या लाभात असल्याचे सिद्ध करतात काय? | **नकारार्थी.** |
| ०२ | वादी न्यायाचा/सोयीचा समतोल त्याच्या बाजूने असल्याचे सिद्ध करतात काय? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ०३ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्याचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय? | **नकारार्थी.** |
| ०४ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यास पात्र आहेत काय? | **नकारार्थी.** |
| ०५ | आदेश काय? | **अर्ज नामंजूर केला.** |

## का र ण मि मां सा

०८. वादीने खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. गट क्रमांक ४१८ चा अधिकार अभिलेख उतारा **नि.क्र.०८**,

२. फेरफार क्रमांक २७५६ **नि.क्र.०९**,

३. बक्षीसपत्र दस्त क्रमांक ३४८९/२०२१ **नि.क्र.०४/३**,

०९. प्रतिवादींनी खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. दस्त नोंदणी क्रमांक १२९९/१९९५ **नि.क्र.३६/१**.

२. दस्त नोंदणी क्रमांक १३००/१९९५ **नि.क्र.३६/२**.

३. फेरफार क्रमांक १४३ व १४४ **नि.क्र.३६/३**.

**मुद्दा क्रमांक ०१ बाबत –**

१०. वादीतर्फे **विद्वान विधीज्ञ श्री. सराफ** यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मिळकत वादी प्रतिवादींची एकत्र कुटुंबाची वडीलोपार्जीत मिळकत असून त्यामध्ये वादींचा हिस्सा आहे. वादींनी वाटणीसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ने वाद मिळकतीचे बेकायदेशीर बक्षीसपत्र दिनांक २०.०९.२०२१ रोजी प्रतिवादी क्रमांक ०३ च्या हक्कात करुन दिले आहे.

**११**. प्रतिवादींतर्फे **विद्वान विधीज्ञ श्री. गोरे** यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मिळकत वडीलोपार्जीत नसून ती प्रतिवादी क्रमांक ०१ ने दस्त नोंदणी क्रमांक १२९९/१९९५ आणि १३००/१९९५ अन्वये पुष्पाबाई ज्ञानदेव वाघमारे आणि लिंबराज माधवराव वाघमारे यांचेकडून खरेदी केली असून ती त्याची स्वसंपादित मिळकत आहे. वादी क्रमांक ०१ चे पती आणि प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०५ यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. प्रतिवादी क्रमांक ०१ ने प्रतिवादी क्रमांक ०३ च्या हक्कात बक्षीसपत्र दस्त क्रमांक ३४८९/२०२१ करुन दिले आहे. म्हणून प्रस्तूत अर्ज **नि.क्र.०५** फेटाळावा.

**१२**. वादी प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद आणि त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादी क्रमांक ०१ ने वाद मिळकत दस्त नोंदणी क्रमांक १२९९/१९९५ **नि.क्र.३६/१** आणि १३००/१९९५ **नि.क्र.३६/२** अन्वये पुष्पाबाई ज्ञानदेव वाघमारे आणि लिंबराज माधवराव वाघमारे यांचेकडून खरेदी केली आहे. म्हणून वाद मिळकत प्रतिवादी क्रमांक ०१ ची स्वसंपादित असल्याचा निष्कर्ष निघतो. वादींनी वाद मिळकत वादी–प्रतिवादींची वडीलोपार्जीत असल्याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा दाखल नाही. म्हणून अर्ज सकृतदर्शनी वादींच्या लाभात नाही हे स्पष्ट होत आहे. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०१** ला **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ०२ बाबत :–**

**१३**. प्रतिवादी क्रमांक ०१ ने त्याची स्वसंपादित मिळकत त्याचा अज्ञान नातू प्रतिवादी क्रमांक ०३ च्या हक्कात नोंदणीकृत बक्षीसपत्राने बक्षीस दिली आहे. वादींचा त्या मिळकतीशी कोणताही हक्क, हितसंबंध वादी स्थापित करु शकले नाहीत. म्हणून न्यायाचा/ सोयीचा समतोल वादींच्या हक्कात नसून तो प्रतिवादींच्या हक्कात आहे. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०२** ला **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ०३ बाबत :–**

१४. वादींचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींच्या मालकी हक्कावर निर्बंध येणार आहे. म्हणून वादींचे पैशांच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान संभवत नाही. याऊलट वादींचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे नुकसान संभवत आहे. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०३** ला **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ०४ बाबत :–**

१५. वादी तुर्तातुर्त ताकीद हुकूम मिळण्यासाठी आवश्यक असलेले तिन्ही घटक सिध्द करण्यात अयशस्वी झाले आहेत. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०४** ला **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो. म्हणून मी, **मुद्दा क्रमांक ०५** ला उत्तर देण्यासाठी खालील आदेश पारीत करणे न्यायाचे झाले आहे असे समजतो.

**आदेश**

०१. वादींनी शपथपत्रासह ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ९४(क) सह क्रम ३९ नियम ०१ व ०२*** अनुसार दाखल केलेला अर्ज **खर्चासह नामंजूर** करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2022.10.04 15:13:17 +0530

**(श्री. सुभाष लक्ष्मण फुले.)**

**दिनांक :– ०३.१०.२०२२.** **दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**